◆ बुलडाणा ◆ वर्ष - 3 ◆ अंक - २२७ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम

दैनिक शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

**TRENDING NEWS**

'कल्की 2898 एडी'च्या सिक्वेलमधून दीपिका पदुकोण बाहेर पडली:निर्मात्यांनी सांगितले की योग्य भागीदारी होऊ शकली नाही, चित्रपटासाठी पूर्ण

■ पान 3 वर



## थोडक्यात

### खंडणीची मागणी

**यवतमाळ :** खंडणीची मागणी करून जिवे मारण्याची धमकी दिल्यावरून गुन्हा नोंद करण्यात आला. याप्रकरणी फिर्यादी हे लोकांना बधाई (भिक्षा) मागत असतांना आरोपी हे तेथे येवुन फिर्यादीस आम्हाला नियमीत एक लाख रूपये हप्ता (खंडणी) द्या असे म्हटल्याने फिर्यादीने त्यांना नकार दिल्याने शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना आर्णी रोडवरील गुरूव्दारा समोर घडली. याप्रकरणी सनाबाई गुरू नाजणी नायक यांच्या तक्रारीवरून संदीप उर्फ मुस्कान कसनदास चव्हाण व इतर तिघांविरूध्द गुन्हा नोंद केला.

### धक्का लागल्यावरून वाद

**यवतमाळ :** लोहारा चौक यवतमाळ येथे धक्का लागल्यावरून वाद केला. याप्रकरणी फिर्यादीचा धक्का लागल्याच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व हातील कड्याने हनुवटीवर तसेच डाव्या कानावर मारून जखमी केले. ही घटना १५ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी गजानन ज्ञानेश्वर तपासे यांच्या तक्रारीवरून अभिषेक चोकडे पुर्ण नाव माहिती नाही विरूध्द गुन्हा नोंद केला.

### जागेच्या कारणावरून वाद

**राळेगाव :** जागेच्या कारणावरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी वलिनगर येथे फिर्यादी सोबत जागेच्या कारणावरून वाद करून शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवून काठीने डाव्या हातावर मारून हात फॅक्चर केला. याप्रकरणी इंदु मारोती कुमरे यांच्या तक्रारीवरून भास्कर किनाके विरूध्द गुन्हा नोंद केला.

### युवकावर चाकुने हल्ला

**यवतमाळ :** युवकावर चाकुने हल्ला करून जखमी केल्याची घटना हनुमान मंदीराजवळ पिंपळगाव येथे घडली. याप्रकरणी घटनास्थळी उभे असेल्या युवकाला आरोपीने दुचाकीवरून येवुन फियादीस हाच लाप्याचा भाऊ होय याला उचला असे म्हणून गालावर थापडाबुक्याने मारहाण करीत असतांना तुम्ही मला का त्रास देत आहे असे म्हटले असता फिर्यादीस शिविगाळ करून जिवाने मारण्याच्या उद्देशाने चाकुने हल्ला करून जखमी केल. याप्रकरणी रोहीत बंडु पवार यांच्या तक्रारीवरून रोशन भांडेकर, हर्षु रायडर, ओम डोंगे, आदित्य लोटे विरूध्द गुन्हा नोंद केला.

मराठा आरक्षणाच्या जीआरवरून वाद | मनोज जरांगेंना केला थेट सवाल | न्यायालयात रिट याचिका दाखल केल्याची माहिती

# जीआर मागे घ्या नाहीतर आवश्यक सुधारणा करा

## छगन भुजबळांचा यांचा जोरदार हल्लाबोल


बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातील ओबीसी समाज नाराज झाला आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे दाखवली आहे. अनेकवेळा पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच राज्य सरकारने काढलेल्या जीआरवर देखील त्यांनी आक्षेप नोंदवला आहे. हा जीआर मागे घ्या, नाहीतर आवश्यक ते बदल करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. आज देखील भाषणात बोलताना छगन भुजबळ यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून टीका केली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाजाचा मोठा विजय झाला अशा बातम्या येत आहेत. मीडिया मंडळींनी नीट ऐकून घ्यावे हा जीआर निघाल्यानंतर अनेकांनी आपापल्या पद्धतीने हायकोर्टाकडे धाव घेतली. त्यातल्या काही लोकांनी पीआयएल केले, आम्ही त्यांना सांगितले हे चुकीचे होईल. अनेक वकील जे आहेत त्यांच्याशी आम्ही रात्रंदिवस चर्चा करत आहोत. त्यांनी सांगितले की आपल्याला पीआयएल नाही करायचे रिट करायचे. मग ज्यांनी पीआयएल केले होते त्यांनी विनंती केली की आम्हाला रिट करण्यासाठी मुभा द्यावी. तिथे त्यांचा पीआयएल नाकारला गेला त्यामुळे चुकीचा गैरसमज लोकांमध्ये पसरला. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, आतापर्यंत आम्ही चार ते पाच रिट अर्ज केले आहेत. एक केले आहे कुणबी सेनेच्या वतीने, दुसरे केले आहे नाभीक समाजाच्या वतीने, तिसरे माळी समाजाच्या वतीने, चौथे जे आहे समता परिषदेचे आमचे एक अधिकारी आहेत त्यांच्या वतीने केले आहे. असे आमचे 5-6 रिट केलेले आहे. आता त्याची सुनावणी सुरू होईल आणि अतिशय काळजीपूर्वक वकील नेमले आहेत. मला खात्री आहे की निश्चितपणे आपली मागणी आहे एकतर हा जीआर मागे घ्या नाहीतर आवश्यक त्या सुधारणा करा, अशी आपली मागणी आहे. त्यात निश्चितपणे आपल्याला यश मिळणार, असा विश्वास भुजबळ यांनी व्यक्त केला. छगन भुजबळ म्हणाले, हा लढा बाबासाहेबांनी सुरू केला आहे. नंतर मंडल आयोग आला, तो आयोग सुद्धा दाबून ठेवला होता. नंतर व्ही.पी. सिंह आले आणि त्यांनी सांगितले की हा आयोग मला मान्य आहे आणि ओबीसींना आरक्षण देत आहे. त्यावेळी मी त्यांचे स्वागत केले. त्या दिवशी पेपरमध्ये आले होते की भुजबळ यांनी स्वागत केले. त्यावेळी मी शिवसेनेचा महापौर होतो. तेव्हा बाळासाहेब ठाकरे आणि आमचे मतभेद व्हायला सुरू झाले.

### डॉ. बाबासाहेबांनी सांगून सुद्धा गरिबांसाठी आयोग नेमला नाही

**एक इतिहास म्हणून आपल्याला माहीत पाहिजे की मंडल आयोगाच्या पूर्वी वेगवेगळ्या राज्यांनी आपापल्या परीने वेगवेगळ्या समाजाला आरक्षण दिले. देशमुख समिती फार नंतर स्थापन करण्यात आली. त्यांनी सांगितले होते की मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलेले आहे की हा ओबीसी समाज त्यात आज देशात हजारो जाती आहेत, आपल्याकडे 374 जाती आहेत. हा अतिशय गरीब आहे, अडचणीतला आहे. यांची माहिती गोळा करा, आयोग निर्माण करा आणि यांना आरक्षण द्यायला पाहिजे. कळम 341 मध्ये त्यांनी दलितांना आरक्षण देण्याचे सांगितले आहे, 342 मध्ये आदिवासी समाजाला आरक्षण देण्याचे सांगितले आहे. परंतु, भारत सरकारने आयोग नेमला नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी भारत सरकारचा राजीनामा दिला त्यात त्यांनी जी कारणे लिहिली होती त्यात एक कारण हे देखील होते की मी सांगून सुद्धा या गरिबांसाठी आयोग नेमला नाही. मग कालेलकर आयोग नेमण्यात आला आणि त्यांनी सांगितले की आयोग नेमला पाहिजे, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली.**



# जिल्ह्यातील मुख्य बाजारपेठ धाड बसस्थानक जैसे थे

## काम अपूर्ण, नागरिक त्रस्त

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ अभिनय प्रमोद बोर्डे

**धाड :** जिल्ह्यातील प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाड येथील बसस्थानकाचे बांधकाम अनेक महिन्यांपासून अपूर्ण अवस्थेत आहे. वारंवार तक्रारी करूनही स्थितीत काहीही बदल झालेला नाही. याआधीही स्थानिक वृत्तपत्रांतून प्रशासनाचे लक्ष वेधले गेले होते, मात्र ठोस पावले उचलली गेली नाहीत. नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी वाढत चालली असून, रोजच्या प्रवासात त्यांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.*

बसस्थानक परिसरात जागोजागी खड्डे व चिखल असल्यामुळे प्रवाशांना पावसाळ्यात विशेषतः मोठ्या अडचणी येतात. छोट्या गड्ड्यात पाणी तुंबून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे आणि आजारपणाचा धोका निर्माण झाला आहे. परिसरात कुठेही स्वच्छतेची योग्य व्यवस्था नाही, तर प्रसाधनगृह पूर्णपणे अस्वच्छ अवस्थेत आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने प्रवासी व स्थानिक दुकानदारांना त्रास सहन करावा लागत आहे.प्रशासनाने काही दिवसांपूर्वी मुरूम टाकून तात्पुरती डागडुजी केली होती, मात्र त्यामुळे धुळीचा त्रास वाढला असून पावसात अधिक चिखल तयार होऊन परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. खाजगी वाहनधारकांनी बसस्थानक परिसर पार्किंगसाठी वापरणे हे मोठे आव्हान ठरले आहे. यामुळे बस व प्रवासी या दोघांनाही अडचण निर्माण होते. कॅंट्रोलर यांनी वारंवार ताकीद दिल्यानंतरही वाहनधारक उर्मटपणे वावरत असल्याचे नागरिक सांगतात. स्थानिक प्रवासी सांगतात, "दररोज चिखलातून चालत बस गाठावी लागते, पावसाळ्यात तर हे अधिकच धोकादायक होते. प्रशासनाने तातडीने काम पूर्ण करून स्वच्छतेची व्यवस्था करावी." यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांना वेळेवर शाळेत पोहोचणे अवघड जाते, तसेच अनेक रुग्ण जिल्हा मुख्यालयात उपचारासाठी जात असल्याने त्यांना या अवस्थेत अधिक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी "बसस्थानकाचे काम लवकरच पूर्ण केले जाईल आणि प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील" अशी माहिती दिली आहे. मात्र नागरिकांचे म्हणणे आहे की, वारंवार आश्वासने दिली जात असली तरी प्रत्यक्षात कामाचा वेग अत्यंत मंद आहे.



### आग सोमेश्वरी, बंब रामेश्वरी

**बसस्थानकातील सर्वात मोठी समस्या म्हणजे खाजगी वाहनधारकांनी केलेला अतिक्रमण. खाजगी वाहनचालक बसस्थानक परिसराचा वापर पार्किंगसाठी करत असल्याने, एसटी बस आणि प्रवाशांना मोठी अडचण निर्माण होते . आगाराच्या नियंत्रकांनी (कंट्रोलर) वारंवार ताकीद देऊनही , हे वाहनधारक उर्मटपणे वागत असल्याचे नागरिक सांगतात . त्यामुळे प्रशासन मूळ समस्येवर तोडगा काढण्याऐवजी दुसरीकडेच लक्ष देत असल्याची भावना निर्माण झाली आहे .**

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात

बातमी जगत | प्रतिनिधी

**दुधा :** कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन महात्मा गांधी प्रशासकीय सेवा महाविद्यालय, दुधा येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाची स्थापना १८ सप्टेंबर १९९८ रोजी झाली असल्याने हा दिवस दरवर्षी स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:३० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर कविकुलगुरू कालिदास यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या सोहळ्याला महाविद्यालयातील प्रा. डॉ. गणेश कड, प्रा. डॉ. शिवाजी विसपुते, प्रा. सौ. मीरा तुपकर, श्री. सुरेश सोनवणे, श्री. पवन सोनुने, विनोद इंगळे, श्री. सूरज पवार, प्रा. प्रवीण कोल्हे, प्रा. सौ. अलका खांडवे आणि श्री. अजय चिंचोले यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी मिळून विद्यापीठाच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या आणि भविष्यातही शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरेची आठवण करून देणारा ठरला.

# एम.ई.एस. फार्मसी महाविद्यालयात 'फार्मसिस्ट डे' निमित्त भव्य रक्तदान शिबिर

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत

**मेहकर :** एम.ई.एस. फार्मसी महाविद्यालयात महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी 'फार्मसिस्ट डे' च्या अनुषंगाने १७ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधीर मुळे यांच्या हस्ते झाले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून लीलावती ब्लड बँक, बुलढाणा येथील अधिकारी हरिओम क्षीरसागर आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सुधीर मुळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रक्तदानाचे महत्त्व आणि शिबिराच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. "रक्तदान हे सर्वोच्च दान आहे. रक्ताच्या एका थेंबाने एखाद्याचा जीव वाचू शकतो. आजच्या तरुणांनी सेवाभाव ठेवून समाजहितासाठी पुढाकार घ्यावा," असे आवाहन त्यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात रक्तदान केल्याने होणारे शारीरिक आणि मानसिक फायदे सविस्तर सांगितले. तसेच, रक्तदान कोण करू शकतो, यासाठीचे निकष आणि योग्य काळजी याबद्दलही माहिती दिली. या शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले, ज्यात महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश होता. प्रत्येक रक्तदात्याची वैद्यकीय तपासणी करूनच रक्तदान करण्यात आले. रक्तदान करणाऱ्या सर्व दात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. "आरोग्याची काळजी, समाजाची सेवा" या ब्रीदवाक्याला साजेसा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. सुधीर मुळे, विभागप्रमुख प्रा. रवी मिसाळ आणि प्रा. सुमेध मोहरिल यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली आहे.





**गोष्ट आहे चार ते पाच दशकांपूर्वीची! कधीही घर आणि माय यापासून पारखां न झालेल्या मुलाने दूरवरच्या एका शाळेत प्रवेश घेतला. त्या गावाचं अंतर पंधरा-वीस मैलांपेक्षा फार नसलं तरी त्याकाळी त्याच्या साठी ते जमीन आस्मानाच्या पलीकडील होतं. त्यामध्ये दोन मैलांचं अंतर पायी चालून दोन वेळा बसगाड्या बदलाव्या लागत होत्या. (आजही फारशी काही परिस्थिती बदलली असं काही नाही) गावामध्ये घडलेल्या काही राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा परिणाम म्हणून तिथे बाप आणि भाऊ एका वर्षाआधीच पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मोलमजुरीच्या उद्देशाने पोहोचलेले होते. भाऊ म्हणजे फारसा मोठा नव्हता, तर तो दोन इयत्तानीच पुढे होता. उन्हाळ्यात नाव दाखल करण्याविषयी घरामध्ये चर्चा झाल्यामुळे सुरुवातीला लेकराच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता, त्यामुळे तो आपला प्रवेश कुठे आणि कसा झाला? आपण केव्हा जाणार? ते गाव खूप मोठे असून तेथे दहावीपर्यंत शाळा आहे अशा प्रकारची शेखी तो मित्रांमध्ये मिरवत होता. कारण तोपर्यंत त्यानं घर सोडून दार सुद्धा पाहिलेलं नव्हतं. त्याला परगावी शिकायला जाण्याचं गांभीर्य कळत नव्हतं. त्याची माय म्हणजे त्याचा श्वास, त्याचं सर्वस्व, त्याचं जग होतं. आई शिवाय त्याचं पानही हलत नव्हतं, तरीही त्या अबोध, निरागस, निर्मळ मनाच्या निष्पाप पोराला जाण होत नव्हती की, आपण लवकरच माय पासून दूर जाणार आहोत.**

# आठवणीतील माय!

आपलं लेकरू जरी आनंदात असलं तरी मायची काळजी मात्र वाढत होती. माय-माय करून हरघडी पायाशी घुटमळणारं आणि रात्र झाली की, कुशीत झोपून प्रत्येक गोष्टीला मायला आवाज देणारं माझं लेकरू, व्यवस्थित राहील की नाही? त्याचं माझ्याशिवाय कसं भागणार? मायची ममता त्याला कोण देणार? यासारख्या अनेक प्रश्नांनी तीचं मन गोंधळून गेल्यामुळे तिच्या डोळ्यात गंगा-जमुना उभ्या राहत होत्या. मग हळूच ती आवंढा गिळत खेळणाऱ्या लेकराकडे पाहत राही. संध्याकाळी ती चुलीजवळ स्वयंपाक करायला बसली, की तीनही लेकर तिच्या आजूबाजूला बसून तिच्याशी हितगुज करताना त्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडत असे. चुलीजवळ पेटत्या काड्यांचा थोडासा प्रकाश आणि मातीच्या तेलाचा दिवा एवढ्या प्रकाशात एकमेकांचा चेहराही स्पष्ट न दिसता गप्पांना मात्र रंगत यायची. उजेड कमी असला तरी डोक्यात उजेड पडेल इतपत ज्ञानरूपी प्रकाश त्यांना मायकडून मिळत असे. गप्पा रंगात आल्यावर माय हळूच शिक्षणाचा विषय घ्यायची. ती पूर्णपणे निरक्षर असली तरी तिची शिक्षणावर पूर्ण आस्था आणि भिस्त होती. कारण शिक्षणामुळे अनेकांचं आयुष्य आर-पार बदलून जाताना तिने उघड्या डोळ्यांनी पाहिलं होतं.



म्हणून ती समाजात सुद्धा सांगायची की, 'माणसाचं पोरानं भलं, की ढोरानं भलं'! म्हणून ती दोघांनाही प्रेमाने वाढवत होती. याबद्दल लेकरांना जेव्हा ती ज्ञानाच्या गोष्टी सांगायची तेव्हा ती एखाद्या विद्यापीठाप्रमाणे भासत होती. ती त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल सांगताना म्हणायची की, 'त्यांनी शिक्षणासाठी खूप कष्ट घेतले. शाळेत त्यांना प्यायला पाणी मिळत नव्हतं. वर्गाबाहेर बसून त्यांनी शिक्षण पूर्ण केलं. शिक्षणामुळे संपूर्ण जगात त्यांचं नाव झालं,. त्यासोबतच ती नोकरीवाल्या साहेबांच जीवन कसं असते त्यांना बसायला गाडी, राहायला बंगला, महागडे कपडे याबद्दल ती कुतुहलाने सांगायची. लेकरं मंत्रमुग्ध होऊन ऐकायचे. नंतर परगावी शिक्षणाला जाण्याचा विषय निघायचा तेव्हा मात्र ती भावनिक होऊन बोलायची. तिच्या भावनांवर तिचा ताबा राहत नव्हता. अगदी एखाद्या शिक्षकांसारखी सूचना देता देता कधी तिच्या डोळ्यात अश्रूंचा महापूर थाटायचा हे लक्षात येत नव्हतं. मोठ्या लेकराला ती कळवळल्या मनाने सांगायची की, 'तो लहान आहे. बाप कामाला जाईल, त्यांचं लक्ष देणं होणार नाही, म्हणून तू त्याच्याकडे लक्ष देवून त्याची काळजी घेतली पाहिजे. दोघं आपसात भांडू नका. अगदी बंधूभावाने राहा'. अशा अनेक सूचना देताना ती हतबल झाल्यासारखी दिसायची. तेव्हा मात्र चुलीजवळ भयान शांतता पसरात होती.

शेवटी परगावी जाण्याचा दिवस उजाडला. त्या दिवशी माय सकाळी लवकर उठून तिने ज्वारीच्या भाकऱ्या व उपलब्ध असेल ती दाळभाजी केली. दोन्ही लेकरांची आपल्या हाताने (साबणाच्या अभावामुळे) कवेलूच्या तुकड्याने अंग घासून-घासून आंघोळ घालून दिली. आंघोळ घालतानाही तिची सूचनांची सरबत्ती काही थांबत नव्हती. परंतु त्या नऊ वर्षांच्या अल्लड लेकराला त्याचं गांभीर्य अजूनही कळत नव्हतं. तो मात्र वेगळ्याच जगात वावरत होता. बघता बघता निघण्याचीही वेळ झाली. दोन्ही लेकरांना वाटी लावण्यासाठी माय थोड्या अंतरासाठी सोबत निघाली. सरळ जाणारी पाऊलवाट, त्यात दिवस उन्हाळ्याचे त्यामुळे जंगल एकदम निर्मनुष्य होतं. दूरपर्यंत कोणाचा थांगपत्ता नाही. सोबत चालताना मायनं बरच अंतर कापलं. तिची माया तिला थांबू देत नव्हती. आपली पिल्लं आपल्यापासून दूर जाताना तिच्या मनाची कालवा-कालव होत होती. ती एखाद्या घायाळ हत्तीनीप्रमाणे भासत होती. तिचे पाय थांबायचं नाव घेत नव्हते. शेवटी तिला थांबावं लागलं. तेव्हा तिच्या हृदयाचा बांध एकदम फुटला आणि एक-एका डोळ्याला दोनदोन धारा लागल्या. ती पटापट लेकरांचे मुके घेऊ लागली. मायला रडताना पाहून लेकरांना प्रसंगाचं गांभीर्य कळायला लागलं. त्याच्या लक्षात आलं, की हा निर्णय सोपा नाही. त्याचेही डोळे पानावले. ते पाहून मायचा हुंदका आणखीच दाटून आला. परंतु स्वतःला सावरत तीनं, 'जा आता बरोबर' एवढं म्हणून मोठ्या लेकराला सूचना केली की, 'गर्दीत त्याचा हात सोडू नको'. लेकरं डबडबल्या डोळ्यांनी पुढे चालू लागली. माय त्यांच्याकडे एकटक पाहत जाग्यावरच उभी होती. लेकरं पावला-पावलांवर मायकडे मागे उलटून पाहत होते. माय फक्त हात हलवून जाण्याचा संकेत करत होती. नजर पुरेल तिथपर्यंत माय जागेवरच उभी होती. अंतर वाढत होतं. माय दिसेनाशी होत होती. त्यामुळे लेकर जाग्यावरून उंच टाचा करून मायला शोधण्याचा प्रयत्न करत होते. त्यात लहान लेकराला एक युक्ती सुचली तो एका उंच टेकडावर जाऊन पाहू लागला, परंतु सर्व निरर्थक. माय दिसेनाशी झाली होती. गाईपासून ताटातूट झाल्यामुळे सैरावैरा धावणाऱ्या वासराप्रमाणे त्यांच्या मनाची घालमेल सुरू झाली. जवळच दोन मैल अंतरावर पुढील शिक्षणाची व्यवस्था असतानाही या लेकरांची मायपासून ताटातून का झाली? त्या कुटुंबावर गाव सोडण्याची पाळी का आली? याची कारणमिमांसा केल्यानंतर लक्षात येते की, त्याची अनेक कारणं होती. त्यापैकी सर्वात मोठं कारण म्हणजे त्या गांवखेड्यातील बिघडलेली सामाजिक परिस्थिती! एकेकाळी गुण्यागोविंदाने नांदणारा स्वयंपूर्ण गाव; एका जातीयवादी पक्ष संघटनेच्या आहारी गेल्यामुळे एकमेकांना पाण्यात पाहू लागला. त्याचे परिणाम वाढत जाऊन एक दिवस दोन गट एकमेकांच्या अमोरासमोर शस्त्रानिशी उभे ठाकले. हाणामारी, डोकेफोडी होऊन अनेक जण जखमी झाले. वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे जीवितहानी टळली. परिणामी गावात पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाला. कोणी कोणाला मजुरीला सांगत नव्हतं. अल्पसंख्याक गटावर उपासमारीची पाळी आली. म्हणून अनेकांनी गाव सोडणे पसंत केलं. त्यामुळे कित्येक कुटुंब परागंधा झाली. परंतु लेकराच्या कुटुंबाने मात्र वेगळाच निर्णय घेत, मायनं सर्वात लहान मुलीसह गावी राहून जमिनीचा तुकडा सांभाळावा, तर बापानं बाहेरगावी मोल-मजुरी करून घर चालवावं. त्यात बापानं आणखी एक धाडस केलं, ती म्हणजे लेकरांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. कारण गावात तिसरीपेक्षा जास्त शिक्षणाची व्यवस्था नव्हती. माय खूप कणखर बाण्याची होती गावातील सामाजिक सलोखा पूर्णपणे बिघडलेला असतानाही ती मोठ्या धैर्याने गावात राहत होती. तिच्या निडरपणाची अनेक जण दाद देत होते. तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाची हिम्मत होत नव्हती. एकदा बापाला काही लोकांनी जातीय भावनेने घेरलं, तेव्हा ती हातात विळा घेऊन माणसांच्या गराड्यात बापाच्या पुढे एकदम ढालीसारखी उभी होती. पर्यायाने हल्ला करण्याची कुणाचीही छाती झाली नाही. गावात जातीय दंगल झाली तेव्हाही ती हातात मिरची पूड आणि तिखट पाणी घेऊन विरोधकांना नामोहरम करण्यासाठी माणसांच्या खांद्याला खांदा लावून लढत होती. 'निर्भय व्हा आणि जगाचं राज्य मिळवा' हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश बहुतेक तिनं ऐकला असावा, म्हणून ती मरणालाही घाबरत नसावी. कुटुंबावर कितीही मोठं संकट आलं तरी ती सर्वांना धीर धीर देत होती. संकटावर मात कशी करावी, त्यातून मार्ग कसा काढावा, यामध्ये तिचा हातखंडा होता. अनेक जण तिचा सल्ला सुद्धा घेत होते. लेकरं मोठे होऊन संसारिक झाल्यावरही कुटुंबात तिची टेक कायम होती. जशी ती कणखर होती, तशीच ती कष्टाळू आणि कणवाळू सुद्धा होती. तिच्या हयातीत कुटुंबकलह कधीच कुणाच्या नजरेस पडला नाही. शेवटच्या काळात शिक्षणामुळे थोडी बहुत परिस्थिती बदलली. परंतु तिचा अहं मात्र कधीच बदलला नाही. त्यामुळे आजही तिचे लेकरं तिच्या पाऊलखुणा शोधतात आणि त्यावरच मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न करतात. लेकरांकडे मायबापाचा विषय निघाला की, त्यांच्या आठवणीने त्यांचा जीव कासावीस होऊन मेटाकुटीला येतो आणि त्यांना जाणीव होते की, जगात सर्व काही मिळतं परंतु मायबाप नाही!.......

**- भिमराव परघरमोल**
**लेखक, व्याख्याता तथा अभ्यासक फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जि. अकोला**
**मो.९६०५६१०४**

# स्व भोजराजभाऊ नरहरी गाडेकर पत्रकारितेच्या पथावरचा एक व्रतस्थी मुशाफिर

वो तो बतला रहा था कई दिन का सफर
जंजिर खिंच कर जो मुसाफ़िर उतर गया
बिछडा कुछ इस अदा से के रुत ही बदल गई
एक शख्स सारे शहेर को विरान कर गया

**भोजराजभाऊ, आपण गेलात,पाच दिवस उलटले, मन खिन्न आहे,उदास आहे,दैनंदिन व्यस्ततेतही चित्त थाऱ्यावर नाही अगदी वाऱ्यावर आहे,अस्तित्वाभोवती आकारले,साकारले जात आहे एकलेपणाचे सुनसान बेट, आपल्या जाणिवांची मुळे एखाद्या व्यक्तीत इतकी खोलवर रुजतात की विलगतेचा विचार जरी डोक्यात शिरला की आपण स्वतः उन्मळून पडण्याची शक्यता बळावते,त्या व्यक्तीच्या सहवासात घडलेले असते आपल्या भावविश्वाचे हळवे शिल्प,त्या व्यक्तीने जवळून अनुभवलेली असते आपल्या जडणघडणीच्या काळातली घुसमट,घुसळण,सांत्वन म्हणून पाठीवरून फिरवलेला असतो हात मायेने, प्रेमाने घातलेली असते आपल्या सामाजिक एकलेपणाच्या जखमेवर फुंकर,शिखर गाठल्यानन्तर जी माणसे पायथ्यातल्या उलथापालथिंना आयुष्यभर ध्यानात ठेवतात तीच माणसे उपभोगू शकतात शिखरावरच्या सुखासीन ऋतूंचा नितळ,निर्मळ आनंद,भोजराजभाऊ स्थिरस्थावर झाल्यावर आपण दोघांनी डाव्या कंसात कधी टाकल्या नाही पडझडीतल्या काळातल्या सलग हालअपेष्टा अनन्वित खस्ता,आपण दोघेही भूतकाळ न विसरता चालत राहिलो कृतज्ञतेच्या वाटा विनम्रतेने,**

भोजराजभाऊ,तुम्ही गेले त्या दिवशी अंत्यविधीला हजर राहू शकलो नाही, भाच्याचं लग्न, आयोजनाची,नियोजनाची सगळी धुरा माझ्या खांद्यावर, पत्रिका वितरणासाठी मी जिल्ह्याबाहेर गेलेलो,अपराधभावाची वावटळ मनभर सणाणत होती,मन सैरभैर झाले होते, अंत्यसंस्काराच्या दुसऱ्या दिवशी भाच्याने लग्न उरकून आपल्या रक्षाविसर्जनविधीत सहभागी होता यावं म्हणून घर गाठले, लग्नकार्याचा थकवा,शिणवटा असूनही उत्तररात्रीपर्यंत डोळ्याला डोळा लागला नाही,अंथुरणावर बदलत राहिलो कडेवर कड, वाट पाहू लागलो उजाडण्याची, अस्वस्थतेचा कडेलोट अनुभवत एकदाची उजाडली पहाट, कानावर पडला वाड्यातल्या चिमण्यांचा चिवचिवाट,धावपळत एकदाचे गाठले आपले गाव सवडद, आपल्या अंगणात पाऊल ठेवताच झाल्या घासातला घास मायेने भरवणाऱ्या बंधुतुल्य मित्राच्या आठवणी ताज्या,आठवला खिसा नसलेला कडकडीत काळ, भोजराजभाऊ अर्थकारणाच्या तजविजीच्या भानगडीत न पडता वाळूकासारखा भेगाळलेला तो काळही आपण दोघे एकमेकांची काळजी वाहत जगलो एका अनामिक धुंदीत,ती धुंदी,तो कैफ होता वस्तुनिष्ठ,मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा,त्या काळाला होते आदर्शवादाचे,समर्पणाचे,वैचारिकतेचे अगणित कंगोरे, जगण्याच्या पाठीवर होती झपाटलेल्या कार्यकर्तेपणाची झूल, उपाशीतपाशी माणसांनी एक तिळाचा दाणा करवंडून खावा या कफल्लक पठडीत मोडणारे आपले तत्कालीन कंगालपण, आत्मानंदाने शिगोशिग भरून



ओसंडणारे,

कर्ब चेहरे से माहो साल का धोया जाये
आज फुरसत से कहीं बैठ के रोया जाये

भोजराजभाऊ आपण दोघे पहिल्यापासून आयुष्याच्या प्रत्येक संगरात एकट शिलेदार,मला,तुम्हाला शब्दांचा, भाषेचा पत्रकारितेचा,साहित्याचा कुठला वसा ना वारसा, पायतळी वडिलोपार्जित संघर्षाच्या रखरखीत वाटा, हात लिहिता,गळा गाता आणि मळा भिजका असला की सृजनाचा उत्सव होत असतो,आपला हात आयुष्यभर लिहिता राहिला,शिष्य म्हणून मी मनसोक्त ओतली आपली चिकित्सक स्वभावात भाषिक रसद,मी मराठी, माझी भाषा कमावलेली,वस्तुनिष्ठ पत्रकारितेच्या घडणीसाठी आपण केला तिचा प्रामाणिक वापर,या रसदीवर कैक आव्हानांचे शिवधनुष्य आपण लिलया पेलले, आविष्कारांच्या जमिनीशी,निर्मितीच्या सुपीक प्रदेशाशी जुळत गेली निर्मितीची नाळ,विदर्भ न्यायचे संस्थापक संपादक या नात्याने रचत गेलात वाचनीय,संग्रहनीय पुरवण्यांच्या उंच,उंच उतरंडी,बिनीचे शिलेदार झालात ग्रामीण वृत्तसृष्टीचे, परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल ढळला नाही आत्मविश्वास तुमच्यातला कणखर,घाव पडल्यावरही घायाळ झालात नाही चुकून,लिहित राहिलात,बोलत राहिलात सडेतोड, स्पष्टवक्तेपणाचे बिल्लोरी आरसे चक्काचूर होणार नाही याची घेत राहिलात निकराने दक्षता, तसा आपला स्वभाव अबोल,विनाकारणची भाषेची उधळपट्टी तुमच्यासाठी वर्ज्य,अघळपघळ बोलतांना मी तुम्हाला कधी बघितला नाही,तुमचे माझ्यावर मूक प्रेम,प्रेमाच्या केंद्रस्थानी पराकोटीचा जिव्हाळा, तुमच्या रक्षाविसर्जनच्या दिवशी तुमच्यवर प्रेम करणाऱ्या जिवाभावाच्या माणसाच्या हातात पत्रातपस्वी मथळा धारण केलेली पुरवणी पडावी यासाठी संतोषचा जिवतोड आटापिटा सुरू होता,वास्तविक पाहता ही पुरवणी तुमच्या हयातीत काढण्याचा संतोषचा सश्रद्ध बेत होता,पण अवेळी नियतीने मखलाशी केली आणि आपण मिटले डोळे कायमचे, आपल्या अभ्यासू नजरेखालून जाऊ शकला नाही आपल्याविषयीचा कौतुकभरला मजकूर ही जखम आयुष्यभर संतोष आणि माझ्या मनात भळभळती राहणार,जगातला कोणताही मलम भरू शकणार नाही भलभळत्या त्या जखमेला, बापाने इहलोकाची यात्रा संपवली पण बापाच्या रक्षाविसर्जनाच्या शोकदग्ध दिवशी बापाच्या आजतागायतच्या कार्याला वाहिलेली पुरवणी प्रसिद्ध व्हावी म्हणून दुःखाचा डोंगर कोसळलेल्या मुलाने आपला संकल्प तडीस नेला,रक्षाविसर्जनाच्या दिवशी सदरहू पुरवणी माझ्या हातात पडली आणि प्रसिद्ध साहित्यिक के ई पिसे यांचा लेख वाचून आपल्या दारात उभारलेल्या मंडपात मला रडू कोसळले, संतोषची नजर टाळून हिकमतीने मी आसवे पुसली, आणि कागदावर लिहू लागलो उपस्थितांची नावे, हातात पेन होता पण डोळ्यांतल्या ओलसर,धुसर धुक्यांमुळे दिसत नव्हता पुढ्यातला कोरा करकरीत कागद,स्वतःला हिमतीने सावरलं,कारण मी हंबरडा फोडला असता तर धायमोकलून रडले असते संतोष आणि जिवन,पिसे साहेबांनी तुमच्या,माझ्या हळव्या,कातर संबंधाचा झपाटलेला काळ त्या लेखात हुबेहूब सजीव केला,काही प्रसंग तर माझ्या विस्मरणात जमा झाले होते,पिसे साहेबांनी त्या खडतर,संघरशील काळातल्या शाश्वत आठवणींना खुबीने उजाळा दिला, सरसकट आठवला साप्ताहिक विदर्भ न्यायच्या जडणघडणीचा रुपेरी काळ,साप्ताहिक विदर्भ न्याय पंजिबद्ध झाल्यावर आपण माझ्यावर सोपविली कार्यकारी संपादकपदाची महत्तम जबाबदारी, त्या जबाबदारीच्या केंद्रस्थानी होती आपली माझ्यावरची अढळ निष्ठा,आपण दोघांनी धुमधडाक्यात उरकला विदर्भ न्यायचा भव्यदिव्य प्रकाशन सोहळा, पोकळी हा शब्द लेखनासाठी,मनोगतासाठी परवलीचा, त्या शब्दाचे माणूस सहज उच्चारण करतो अन मोकळा होतो,पण या शब्दाची खरी परिचिती येते जेव्हा काळजाजवळचा एखादा माणूस जग सोडून जातो, रिक्ततेची एक सदृश्य टाच सतत चिरडत राहते मन, रूढार्थाने कळतो सराईत भाषिक पातळीवरच्या पोकळी या शब्दाचा अर्थ, भोजराजभाऊ,किती जीवघेणा, किती भयावह असतो पोकळी या शब्दाचा आज मी अनुभवतोय, भोजराजभाऊ आपण तर निघून गेलात दूरदिगंती कधीही न परतण्यासाठी,पण मी आज अनुभवतोय कैकवेळा लेखनात,मनोगतात उद्धृत केलेल्या पोकळी या विषण्ण शब्दाच्या जीवघेण्या कळा, अगदी लाकडावर करवत चालावी आणि इतस्ततः पांगावा भुगा अगदी याच अस्वस्थ पठडीतल्या परवा तुमच्या रक्षाविसर्जन विधीचं मी सूत्रसंचालन करत होतो,पापण्या क्षणोक्षणी ओलावत होत्या,दाटून येत होता कंठ, व्रतस्थती पत्रकारितेचा वैशाखी वाटा चोखाळताना आपल्या वस्तुनिष्ठ पत्रकारितेच्या माध्यामातून आपण कमावलेली जिवाभावाची माणसे झाडूनपुसून हजर होती,आठवणींचा एकेक पापुद्रा मी सोलत होतो,हरवत होतो भूतकाळात, बिनचेहऱ्याचे कपल्लक,भणंग ते दिवस,आजच्यासारखा भौतिक सुविधांनी सर्वांग नटलेला तो काळ नव्हता,माझे,तुमचे दोघांचे जगणे अभावग्रस्त ओढगस्तीतले,रोज नजरेसमोर प्रापंचिक गरजांची भलीमोठी उतरंड,त्याकाळी आपण जनशक्ती जळगावहुन प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकाचे साखर8 प्रतिनधी म्हणून कार्यरत होता,कट्टर शिवसैनिक म्हणून माननीय तेजरावबापू देशमुख यांच्या लढवय्या,आक्रमक आणि तितक्याच विधायक नेतृत्वाखाली आपली राजकीय वाटचाल समर्थपणे सुरू होती,भोजराजभाऊ आपण हाडाचे कार्यकर्ते जोडीला प्रगल्भ,डोळस,सजग पत्रकार, पत्रकारितेला गुरू म्हणून तुमच्या काळजात माझी सश्रद्ध जागा,ती जागा आयुष्यभर कोणी हिरावू शकला नाही इतक्या भक्तीने आपण ती जागा काळजात सश्रद्धपणे जोजवली,जोपासली, सांभाळली, आयुष्यात कैक गडांतरे, स्थित्यंतरे आली पण कायम राहिली तुमच्या मनात माझ्याविषयीच्या आदराची सश्रद्ध जागा,मनाला आठवणींचं भरतंआलंआहे,उधाणलागतस्मृतीचादरिया,विस्तारभयाच्याफुग्यालालागली आहे टाचणी,लेखणीच्या टोकावर फुलला आहे प्रसंगांचा विस्तीर्ण पिसारा,मन कबूलच करत नाही ऐन वसंतात हे आपले जाणे, खुलासे अधुरेच राहतात आणि निघायची वेळ होते,

**- अजीम नवाज राही**
**9421396669**

**बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S. ) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S. ) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही. ) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील. ) RNI No . MHBIL/25/A1435**

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S. ) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S. ). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act. ) All disputes will be subject to Mehkar Court. ) RNI No. MHBIL/25/A1435

दैनिक बातमी जगत

संमिश्र

शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५



## घटना - घडामोडी



### पेण पोलीस विभागाचा 'हिरवा संकल्प'; 'हरित महाराष्ट्र' अभियानातून वृक्षलागवड

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर

**पेण :** महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' अभियानाला पाठिंबा देत पेण पोलीस उपविभागीय कार्यालयात वृक्षारोपणाचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमातून पोलीस विभागाने केवळ कायदा-सुव्यवस्थाच नव्हे, तर पर्यावरण संवर्धनाचीही जबाबदारी स्वीकारल्याचा संदेश दिला आहे. या उपक्रमात स्वतः पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल यांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण केले. त्यांच्यासोबत वाचक पोलीस उपनिरीक्षक विनोद सुर्वे, पोलीस अधिकारी शाम पाटील आणि दत्ता साळवी यांनीही उत्साहाने झाडे लावली. आजच्या वेगवान औद्योगिकीकरण आणि नागरीकरणामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. यावर उपाय म्हणून राज्य शासनाने 'हरित महाराष्ट्र – समृद्ध महाराष्ट्र' हे अभियान सुरू केले असून, त्याचाच एक भाग म्हणून पेणमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यालयाच्या आवारात लावलेली ही झाडे केवळ हिरवळ वाढवण्यासाठी नसून, भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ हवा आणि सुरक्षित पर्यावरणाची हमी असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. पोलीस अधिकाऱ्यांच्या या कृतीमुळे समाजात पर्यावरणाविषयी सकारात्मक संदेश पोहोचला आहे. स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले असून, पेण पोलीस विभागाचा हा अभिनव उपक्रम इतर शासकीय कार्यालयांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी प्रतिक्रिया दिली.

### राजकारणात वावरताना सुसंकृतपणा दाखवायला हवा

बातमी जगत | प्रतिनिधी

**नागपूर :**कुणीही कोणत्याही पक्षाचे असो, पण राजकारणात वावरताना सुसंकृतपणा दाखवायला हवा. प्रत्येकाने बोलत असताना कुणाला वेदना देणारे वक्तव्य करू नये असा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवारांनी नाव न घेता आमदार गोपीचंद पडळकर यांना दिला आहे. गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्यावर टीका करताना पातळी सोडल्याचे दिसून आले. यावर अजित पवारांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार म्हणाले, संविधानाने आपल्याला अभिव्यक्तीचा अधिकार दिला आहे. पण व्यक्त होताना समाजामध्ये सलोखा राहील, कुणाच्या भावना दुखावणार नाहीत यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

# मेहकर-लोणारसाठी 'नमो उद्यान' मंजूर

## माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या पाठपुराव्याला यश, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मंजूरी

बातमी जगत | प्रतिनिधी



**मुंबई :** 'शुभस्य शीघ्रम' या उक्तीप्रमाणे, माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मोठे यश आले असून , उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मेहकर आणि लोणार तालुक्यासाठी 'नमो उद्यान' योजनेअंतर्गत प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे . या दोन कोटींच्या निधीमुळे दोन्ही शहरांच्या सौंदर्यात भर पडणार असून, नागरिकांसाठी एक हक्काचे विरंगुळ्याचे ठिकाण निर्माण होणार आहे ``.

माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दोन दिवसांपूर्वीच मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती . या भेटीत त्यांनी मेहकर व लोणार नगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांसाठी निधीची मागणी केली होती . त्यांच्या या मागणीची तातडीने दखल घेत, नगर विकास खात्याने हा निधी मंजूर केला आहे . रायमुलकर यांनी या भेटीत केवळ उद्यानांचाच प्रश्न मांडला नाही, तर दोन्ही तालुक्यांतील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याचीही मागणी केली होती , जी शासनाच्या विचाराधीन आहे . राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असल्याने आणि केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे मार्गदर्शन लाभत असल्याने, शहरी आणि ग्रामीण भागांसाठी विविध खात्यांकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळवण्यासाठी आपले प्रयत्न सातत्याने सुरू राहतील, असे रायमुलकर यांनी स्पष्ट केले . या निधी मंजुरीमुळे मेहकर आणि लोणार तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, रखडलेल्या इतर विकास कामांनाही लवकरच गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे . या उद्यानांच्या उभारणीमुळे शहरातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल आणि शहराच्या वैभवात भर पडेल, यात शंका नाही . नगर विकास खात्याचे उपसचिव सचिन सहस्त्रबुद्धे यांनी १७ सप्टेंबर २०२५ रोजी या निधी मंजुरीचे शासकीय परिपत्रक जारी केले . यानुसार, मेहकर व लोणार तालुक्यांसाठी 'नमो उद्यान' उभारणीकरिता दोन कोटी रुपयांची कामे मंजूर झाली आहेत . या योजनेसाठी आवश्यक असलेले अनुदान १०० टक्के असून , ते थेट नगरपालिकांना दिले जाईल . त्यामुळे नगरपालिकांना स्वतःच्या निधीतून कोणताही खर्च करावा लागणार नाही आणि योजनेची अंमलबजावणी वेगाने होईल ``.

### देवाची करणी, नारळात पाणी

माजी आमदार संजय रायमुलकर यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निधीची मागणी केली होती . त्यांच्या मागणीची तातडीने दखल घेत, अवघ्या दोन दिवसांतच नगर विकास खात्याने दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला . रायमुलकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना आणि शिंदे यांच्या सकारात्मक प्रतिसादाला आलेले हे यश म्हणजे 'देवाची करणी, नारळात पाणी' या म्हणीचा प्रत्यय देणारे ठरले आहे ``.

### बोले तैसा चाले

या निधी मंजुरीनंतर बोलताना, माजी आमदार संजय रायमुलकर यांनी मेहकर आणि लोणार नगरपालिका क्षेत्रातील उर्वरित विकास कामांसाठीही लवकरच भरीव निधी आणला जाईल, असा विश्वास व्यक्त केला . राज्यात महायुतीचे सरकार आणि केंद्रात प्रतापराव जाधव यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने , विकासाचा हा झंझावात असाच सुरू राहील, असे ते म्हणाले . 'बोले तैसा चाले' याप्रमाणे ते आपला शब्द पाळतील, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत .

## मालेगाव नगरपंचायत निवडणुकीचे बिगुल लवकरच वाजणार

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ इम्रान सैय्यद



**मालेगाव:** मालेगाव नगरपंचायत निवडणुकीचे बिगुल लवकरच वाजण्याची शक्यता असल्याने शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. प्रभाग रचनेनंतर आता जागांच्या आरक्षणाबाबत जोरदार चर्चा सुरू असून, त्याचबरोबर थेट जनतेतून निवडल्या जाणाऱ्या नगराध्यक्षाच्या नावाचीही चर्चा शिगेला पोहोचली आहे. न्यायालयीन प्रकरणामुळे गेल्या पाच वर्षांपासून रखडलेली ही निवडणूक आता लवकरच होण्याची चिन्हे आहेत, कारण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. प्रशासकीय पातळीवरही हालचाली सुरू झाल्या असून, शहरातील एकूण १७ प्रभागांची रचना पूर्ण झाली आहे. त्यामुळे, आता प्रभागातील आरक्षण जाहीर होण्याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे. पाच वर्षांपूर्वी जाहीर झालेले आरक्षण यावेळी कायम राहण्याची शक्यता असल्याने, त्या दृष्टीने अनेक उमेदवार आपापल्या प्रभागात तयारी करत आहेत. राजकीय नेतेही सक्षम उमेदवारांचा शोध घेत आहेत. नगराध्यक्ष पदासाठी रवीकुमार भुतडा यांच्या नावाची चर्चा नगराध्यक्ष पद थेट जनतेतून असल्याने या पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी गणेशोत्सवाच्या शुभेच्छापर बॅनरमधून आपली दावेदारी जाहीर केली आहे. या बॅनरवर नगराध्यक्ष पदाचे संभाव्य उमेदवार म्हणून अनेक फोटो झळकत आहेत. यातूनच, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि काँग्रेसचे कट्टर समर्थक असलेले रवीकुमार भुतडा यांच्या नावाची नगराध्यक्ष म्हणून जोरदार चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे रवी भुतडा यांच्या नावाची चर्चा सुरू असताना, दुसरीकडे भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्या संभाव्य उमेदवारांबाबतही उत्सुकता वाढली आहे. सध्या तरी बॅनरबाजीमध्ये रवीकुमार भुतडा यांचा फोटो ठळकपणे दिसत असल्याने त्यांच्या नावाची चर्चा शहरात सर्वाधिक आहे. निवडणुकीच्या घोषणेसोबतच नगराध्यक्ष पदासाठी प्रत्यक्षात कोण-कोण रिंगणात उतरणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## 'आई लव्ह मोहम्मद' फलक लावणाऱ्या तरुणांवरील गुन्हे मागे घ्या

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** उत्तर प्रदेशातील कानपूर येथे 'ईद मिलाद-उन-नबी'च्या दिवशी 'आई लव्ह मोहम्मद' असे फलक लावणाऱ्या तरुणांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी अल मदिना फाउंडेशनने राष्ट्रपतींकडे निवेदनाद्वारे केली आहे. कानपूर पोलिसांची ही कारवाई निंदनीय असून, भारतीय संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आणि धार्मिक स्वातंत्र्याचा भंग करणारी असल्याचे फाउंडेशनने म्हटले आहे. कानपूरच्या सय्यद नगर परिसरात पैगंबर मोहम्मद यांच्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी काही मुस्लिम तरुणांनी हे फलक लावले होते. मात्र, पोलिसांनी सुमारे २५ तरुणांविरुद्ध एफआयआर दाखल केला. या घटनेमुळे देशभरातील मुस्लिम अनुयायांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. यावर्षी पैगंबर मोहम्मद यांची १५०० वी जयंती असल्याने अशा ऐतिहासिक क्षणी झालेली ही कारवाई चुकीची आहे, असे अल मदिना फाउंडेशनचे अध्यक्ष नदीम शेख यांनी सांगितले. भारतीय संविधानाचे कलम १९(१)(अ), २५ आणि २१ प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती, धार्मिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार देते. या अधिकारांकडे दुर्लक्ष करून पोलिसांनी केलेली एकतर्फी कारवाई केवळ अन्यायकारक नाही, तर ती संविधानाच्या मूलभूत तत्वांचेही उल्लंघन करते, असे निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणी राष्ट्रपती कार्यालयाने लक्ष घालून सखोल चौकशी करावी, तरुणांवर दाखल केलेले गुन्हे त्वरित मागे घ्यावेत आणि समाजात तणाव निर्माण करणाऱ्या दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नदीम शेख यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींकडे केली आहे. यावेळी हाफिज अस्लम, कारी कलीम, जुबेर शेख, वसीम खान, जावेद कुरैशी, इमाद काजी, फरदीन शेख, नवाज मिर्झा, सलमान खान, साजिद शेख, साकिब खान, शरीम शेख, फरहान शेख, अदनान शेख, मोहम्मद अयान, साजिद खान, तौसीफ शेख, सैयद अलीम, सय्यद तस्लीम, मुशीर खान, समीर पठान आणि मोहम्मद यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान एक वरून

कलकी २८९८ एडी' या चित्रपटाच्या निर्मात्यांनी अधिकृतपणे घोषणा केली आहे की अभिनेत्री दीपिका पदुकोण आता त्याच्या सिक्वेलचा भाग असणार नाही. इंस्टाग्रामवर पोस्ट करताना, टीमने म्हटले आहे की, "काळजीपूर्वक विचार केल्यानंतर, आम्ही वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या चित्रपटाचा लांब प्रवास असूनही, आम्ही योग्य भागीदारी निर्माण करू शकलो नाही. आणि 'कलकी २८९८ एडी' सारख्या चित्रपटासाठी पूर्ण वचनबद्धता आणि बरेच काही आवश्यक आहे. आम्ही त्यांना त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा देतो."
"कल्की २८९८ एडी" हा चित्रपट २७ जून २०२४ रोजी प्रदर्शित झाला. ही कथा महाभारतातील कुरुक्षेत्र युद्धाच्या शेवटी सुरू होते आणि २८९८ एडी या भावी वर्षापर्यंत जाते. "कल्की २८९८ एडी" हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी झाला आणि जगभरात १००० कोटींपेक्षा जास्त कमाई केली. 'कलकी २८९८ एडी' या चित्रपटात दीपिका पदुकोणने SUM-80 म्हणजेच सुमतीची भूमिका साकारली होती. 'कलकी २८९८ एडी' या चित्रपटात दीपिका पदुकोणने SUM-80 म्हणजेच सुमतीची भूमिका साकारली होती.
'स्पिरिट' चित्रपटातून दीपिका पदुकोण बाहेर पडली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे की दीपिका पदुकोण यापूर्वी संदीप रेड्डी वांगा यांच्या "स्पिरिट" चित्रपटातून बाहेर पडली होती. दीपिकाच्या मागण्यांमध्ये आठ तासांच्या शिफ्ट, मोठी फी, नफ्यातील वाटा आणि तेलुगू संवाद नसल्याचा समावेश असल्याचे म्हटले जात आहे.

## पृथ्वीवरील सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी ओझोन थर संरक्षण आवश्यक - जिजामाता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पथनाट्याद्वारे जनजागरण

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ मंजूराजे जाधव



**बुलढाणा :** दि.१८ जगभर १६ सप्टेंबर हा दिवस जागतिक ओझोन दिन म्हणून साजरा केला जातो. पृथ्वीवरील सजीवांच्या अस्तित्वासाठी वातावरणातील ओझोन थर हा सतत कार्यरत राहतो. याच थरामुळे घातक अतिनील किरण पृथ्वीवर येऊन सजीवांना अपाय करीत नाहीत. हा थर नष्ट झाला तर सजीव सृष्टीचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते, हे वास्तव अधोरेखित करत जिजामाता महाविद्यालयाच्या जीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात पथनाट्य सादर करून जागरूकतेचा संदेश दिला. या पथनाट्यातून विद्यार्थ्यांनी "ओझोनचा थर वाचला तरच पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहील, अन्यथा नैसर्गिक आपत्तींचा धोका वाढेल" असा प्रभावी संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी आकर्षक भित्तिपत्रक प्रदर्शनीद्वारेही ओझोन संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमात ओम जोगदंड, अनुज भालेराव यांच्यासह बी.एस्सी. च्या १८ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपक्रम यशस्वी करण्यासाठी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनंत मोरे, डॉ. राहुल उके, प्रा. रेणुका राजपूत व प्रा. शुभांगी चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. तर भित्तिपत्रक प्रदर्शनीसाठी विज्ञान शाखा प्रमुख व रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. संतोष कुंभारे, डॉ. आनंद देशपांडे आणि डॉ. प्रदीप वाघ यांनी मार्गदर्शन केले. आयोजनात श्री. धनंजय ताठे व श्री. भगवान उबाळे यांनी सहकार्य केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवई, कला शाखा प्रमुख डॉ. जे. जे. जाधव, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एस. एन. चिंचोले यांच्यासह डॉ. योगेश रोडे, डॉ. नामदेव ढाले, डॉ. विनय पैकीने, डॉ. डी. जे. कांदे, डॉ. राजश्री येवले, प्रा. पवन ठाकरे, डॉ. गणेश किरोचे, प्रा. गजानन लोहटे, डॉ. विकास पहुरकर, प्रा. राम बनकर, प्रा. अभिजित देशमुख, डॉ. खंडारे, प्रा. प्रफुल गायकवाड, प्रा. भोंडे, प्रा. हिवाळे, सचिन चव्हाण,दिलीप मोरे,गजानन सुसर आदी मान्यवर उपस्थित होते.कनिष्ठ विभागातून प्रा. संभाजी माने, प्रा. पुष्पा वानखेडे, प्रा. रजनी निखाडे, प्रा. पुनसे, प्रा. सुनीता काळवाघे, प्रा. वैशाली मोरे, प्रा. प्रणिता पाटील, प्रा. स्नेहल राऊत व प्रा. नदीम शेख यांनी सहभाग नोंदविला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ओझोन थर संरक्षणाबाबत जागृती निर्माण झाली असून समाजातही हा संदेश पोहोचावा, हा उद्देश या कार्यक्रमामागे असल्याचे प्राचार्य डॉ.सुरेश गवई यांनी सांगितले.

## देगाव तांडा येथे पेट्रोलनेही नाही पेटली चिता, पावसाने केली दुर्दशा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ इमरान सैय्यद



**मालेगांव :** वाशिम तालुक्यातील देगाव तांडा येथे दि. 17 सप्टेंबर रोजी एका वृद्ध महिलेचे निधन झाले. त्यांना अंत्यसंस्काराला नेल्यानंतर स्मशानभूमीत अंत्यसंस्काराचे शेड नसल्यामुळे उघड्यावरच अंत्यसंस्कार करावे लागले. पावसामुळे शव पेटत नसल्यामुळे अनंत अडचणींचा सामना गावकऱ्यांना करावा लागला. या प्रकारामुळे गावकऱ्यांनी शासनाप्रती प्रचंड रोष व्यक्त केला.

आजही जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये स्मशानभूमीसाठी स्वतंत्र जागा नाही. तर ज्या गावांमध्ये स्वतंत्र जागा आहे तिथे अंत्यसंस्काराचे शेड बांधलेले नाहीत. अनेक गावांमधील ही परिस्थिती आहे. देगाव तांडा येथील येथील स्मशानभूमीत तीन शेड बांधलेले नाही. अशातच दि. 17 सप्टेंबर रोजी दुपारी 1 वाजता गावातील वृद्ध महिला स्व. धरमीबाई किसन राठोड 85 यांचे निधन झाले. दरम्यान मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असल्यामुळे पाऊस थांबेल या अपेक्षेवर सायंकाळी 6 वाजेपर्यंत गावकऱ्यांनी प्रतीक्षा केली. मात्र तरीही पाऊस न थांबल्यामुळे गावकऱ्यांनी अंत्यसंस्काराची तयारी केली. मृतात्म्यास चिताग्नी दिल्यानंतर पावसाने जोर पकडल्यामुळे प्रचंड अडथळा निर्माण झाला. यावेळी सरनावर पेट्रोलचा मारा करण्यात आला. तरीसुद्धा सरन पेटण्यास अडथळा येत होता. यावेळी उपस्थित नागरिकांनी शासनाप्रती प्रचंड रोष व्यक्त केला. जोपर्यंत गावात स्मशानभूमीचे शेड व इतर व्यवस्था निर्माण होत नाहीत तोपर्यंत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय गावकरी घेणार असल्याचे बोलले जात आहे. ग्रामीण नागरिकांच्या मृत्यूनंतरही मरणयातना संपता संपत नसल्यामुळे शासनाच्या एकूणच व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. जिल्हाधिकारी याबाबत काय दखल घेतात याकडे गावाकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



## घटना - घडामोडी



### मूळ आदिवासी समाजाचा आरक्षण बचाव आक्रोश मोर्चा ६ ऑक्टोबरला

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ गजानन दसरकर

**बुलढाणा :** महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आरक्षणाच्या वादामुळे मूळ आदिवासी समाजाच्या हक्कांवर गदा येत असल्याचा आरोप करत, आदिवासी समाजाने आरक्षणाच्या संरक्षणासाठी ६ ऑक्टोबर रोजी बुलढाणा येथे 'आरक्षण बचाव आक्रोश मोर्चा' काढण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात १७ सप्टेंबर रोजी बुलढाणा येथील विश्राम भवन येथे सकल आदिवासी समाजाची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची केलेली मागणी, तसेच बंजारा व इतर समाजांकडून आदिवासी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या मागण्यांमुळे मूळ आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धोका निर्माण झाल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, 'एक तीर एक कमान, सर्व आदिवासी एक समान' असा नारा देत ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:३० वाजता एकलव्य महाराज चौक, गांधी भवन येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्याचे सर्वानुमते ठरले. या मोर्चात १३,५०० अतिरिक्त जागांवर आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांची नोकर भरती करावी, यासह अनेक प्रमुख मागण्यांवर भर दिला जाईल. या बैठकीला बुलढाणा जिल्ह्यातील सकल आदिवासी समाजाचे सामाजिक कार्यकर्ते, विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी, तसेच आजी-माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा मोर्चा मूळ आदिवासी समाजाचे हक्क आणि आरक्षण सुरक्षित ठेवण्यासाठी एकजुटीने केलेला प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले.



### 'हा देश तुम्हाला माफ करणार नाही'; एआय व्हिडिओ प्रकरणी भाजप महिला आघाडी आक्रमक

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ स्वप्निल सोनवणे

**जळगाव :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वर्गीय आईबद्दल काँग्रेसच्या बिहार प्रदेशने तयार केलेल्या एआय-जनरेटेड व्हिडिओविरोधात भारतीय जनता पार्टीच्या (भाजप) महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीने मुंबई आणि नाशिक येथे तीव्र आंदोलन केले. हा व्हिडिओ देशातील सर्व मातांचा अपमान असल्याचे म्हणत भाजपने काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला आहे. या आंदोलनादरम्यान बोलताना भाजपच्या विधान परिषद सदस्य चित्रा वाघ यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. "हा अपमान फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वर्गीय आईचा नाही, तर देशातील सर्व मातांचा आहे. राहुल गांधींना शालीनता आणि वर्तनाचे धडे मिळालेले दिसत नाहीत," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. या घटनेचा निषेध करताना आमदार वाघ यांनी म्हटले की, काँग्रेसने निवडणुकीपूर्वीच बिहारमध्ये आपला पराभव मान्य केल्यासारखे वाटते. त्यामुळे, जाहीरनामे आणि आश्वासने यावर बोलण्याऐवजी काँग्रेस नेत्यांनी पंतप्रधानांवर वैयक्तिक हल्ले करण्याचे राजकारण सुरू केले आहे. "कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरून तयार केलेल्या व्हिडिओ क्लिपमध्ये मोदी यांच्या स्वर्गीय आईला दाखवणे ही अत्यंत निंदनीय गोष्ट आहे. हा देश तुम्हाला माफ करणार नाही," असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

# भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

## कै. दराबाई पवार यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त पवार परिवाराचा स्तुत्य उपक्रम, गरजू रुग्णांना आधार

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत





**मेहकर :** कै. श्रीमती दराबाई पवार यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त पवार परिवाराच्या वतीने बुधवार, १६ सप्टेंबर २०२५ रोजी मेहकर येथे भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक गरजू रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले, तर काही जणांना मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आले. सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत झालेल्या या शिबिराचा उद्देश डोळ्यांच्या आजारांचे निदान करणे, आवश्यक उपचार देणे आणि गरजू रुग्णांना मोफत सहाय्य करणे हा होता. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत ३० हून अधिक रुग्ण मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. लवकरच त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. तसेच, पात्र ठरलेल्या एक हजार गरजू रुग्णांना मोफत चष्मेही वाटण्यात आले. या उपक्रमामुळे अनेकांच्या जीवनात पुन्हा एकदा स्पष्ट दृष्टीचे वरदान लाभणार आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोहर गाडे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय उतपुरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विष्णू वाकळे यांनी केले, तर सूत्रसंचालन राजेंद्र गायकवाड यांनी केले. याप्रसंगी डॉ. संजय प्रकाश ठोकरे, सुभाष शिंदे, श्रीराम पवार, डॉ. स्नेहल पठाडे तसेच पवार परिवारातील सदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवाभाव हेच खरे प्रेरणास्थान दिवंगत दराबाई पवार या केवळ कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य नव्हत्या, तर त्या संस्कार आणि मायेचा अखंड स्रोत होत्या. "दुसऱ्याच्या डोळ्यांतील पाणी पुसता आले, तरच आपल्या जगण्याला अर्थ आहे," ही त्यांची शिकवण होती. त्यांच्या याच अमृतवाणीला प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांची नात, ॲड. कु. माधुरीताई देवानंद पवार यांनी या सेवायज्ञाचा संकल्प केला. या शिबिरात रुग्णांना अनुभवी नेत्रतज्ज्ञांकडून मोफत तपासणी, गरजूंना मोफत चष्मे वाटप, आणि शस्त्रक्रियेसाठी निवडलेल्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेची सोय उपलब्ध करून देण्यात आली. समाजासाठी केलेले हे कार्य हीच खऱ्या अर्थाने दिवंगत दराबाई पवार यांना खरी श्रद्धांजली असल्याचा सूर कार्यक्रमात उमटला. पवार परिवाराच्या या उपक्रमाचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले. या शिबिरामुळे "एका ज्योतीने उजळतात अनेक पणत्या" हा भाव प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न माधुरी पवार यांनी केला असून, आजींच्या पुण्यस्मृतींना उजाळा देत दृष्टीदानाच्या या सेवायज्ञाने समाजातील असंख्य गरजूंना नवी उमेद व नवे जीवन दिले असल्याची चर्चा जानेफळ परिसरात सुरू आहे.

### सुरेश जगदाळे यांची पिंपळनेर भाजपा मंडल प्रसिद्धी प्रमुखपदी निवड

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ अनिल चित्ते



**धुळे :** पिंपळनेर येथील कुंभार समाजाचे युवा नेते आणि साक्री तालुका युवा उपाध्यक्ष सुरेश रामदास जगदाळे यांची भारतीय जनता पार्टीच्या पिंपळनेर शहर मंडल प्रसिद्धी प्रमुख पदावर निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे पिंपळनेरसह धुळे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. माजी शहर सरचिटणीस म्हणूनही काम केलेले सुरेश जगदाळे हे भाजपाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांनी पक्षाची ध्येय-धोरणे सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन ही नवी जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे. भाजपचे पिंपळनेर (शहर, जि.प.गट सामोदे) मंडल अध्यक्ष प्रमोद रंगराव गांगुर्डे (पाटील) यांनी जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) बापूसाहेब खलाणे, पालकमंत्री ना. जयकुमार रावल, माजी मंत्री अमरेशभाई पटेल, डॉ. सुभाष भामरे, आणि प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांच्या सूचनेनुसार मंडल कार्यकारिणी जाहीर केली. त्यात सुरेश जगदाळे यांच्या नावाची प्रसिद्धी प्रमुख म्हणून घोषणा करण्यात आली. कुंभार समाजातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आणि युवा उद्योजक असलेल्या सुरेश जगदाळे यांनी अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रांत विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल धुळे जिल्हा कुंभार समाजाचे उपाध्यक्ष रतीलाल कुंभार, जिल्हाध्यक्ष किशोर कुंभार, प्रसिद्धी प्रमुख अनिल चित्ते यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्त्यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### CAPTION कॅमेरा लेन्स.....



अद्याप संपले नाहीत दिशाहीन जगण्याचे हे अपंग खुलासे, भात्यागत धपापणारे तावलेल्या कष्टाळू दैनंदिनीचे उसासे, उगवणाऱ्या प्रत्येक पहाटेला अडीनडीचे धुळकट तोरण आहे, पिढ्यानपिढ्यापासून हाती श्रमाचा घण नि सबुरीची ऐरण आहे. शब्दांकन,अजीम नवाज राही.
छायाचित्र – कैलास राऊत

### मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास युवा पिढीने अंगीकारण्याची गरज- गुणवंत एच. मिसलवाड

बातमी जगत | प्रतिनिधी



**नांदेड :** मराठवाडा मुक्ती संग्रामाचा महान इतिहास युवा पिढीने समजून घेतला पाहिजे आणि त्यातून प्रेरणा घेऊन समाज व देशासाठी काम करण्याची ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते १७ सप्टेंबर २०२५ रोजी नांदेड येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) आगारात ७७ व्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. आपला देश स्वतंत्र झाल्यावरही ५६५ पैकी ३ संस्थाने भारतात विलीन होण्यास तयार नव्हती, त्यापैकीच हैदराबाद हे एक संस्थान होते. अशा परिस्थितीत स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यात लढा सुरू झाला. हा लढा यशस्वी करण्यासाठी देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी 'पोलिस ॲक्शन' राबवल्यानंतर मराठवाडा मुक्त झाला, असे मिसलवाड यांनी सांगितले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ आणि कंधार तालुक्यातील कल्लाळी गावचे अप्पासाहेब नाईक यांच्या योगदानाला उजाळा दिला. या लढ्यात कल्लाळी गावातील ३५ जण हुतात्मा झाले होते, तसेच महिलांचाही मोठा सहभाग होता, असे त्यांनी नमूद केले. यावेळी, त्यांनी शासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या. कल्लाळी येथील हुतात्मा स्मारकाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळावा, मुक्ती संग्रामाचा इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा, आणि स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करावे, अशा मागण्या त्यांनी केल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन एसटीचे विभागीय वाहतूक अधीक्षक तथा प्रभारी आगार व्यवस्थापक मिलींदकुमार सोनाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर, गुणवंत एच. मिसलवाड यांनी सर्व कष्टकरी व कर्मचाऱ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाची सामूहिक शपथ दिली. या कार्यक्रमाला विभागीय वाहतूक अधीक्षक मिलींदकुमार सोनाळे, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विष्णू हारकळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, चार्जमन संदीप बोधनकर, सहाय्यक वाहतूक निरीक्षक मोहम्मद ताजोद्दीन शेख, पाळी प्रमुख मनोहर माळगे, वरिष्ठ लिपिक संतोष ढोले आणि सुरेश फुलारी यांच्यासह एसटी आगारातील बहुसंख्य कर्मचारी उपस्थित होते.


### शेलुबाजार येथे भाजपा जिल्हाध्यक्ष चितलांगे यांचा श्री साई संस्थांच्या वतीने सत्कार

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ दिलीप अवगण पाटील



**वाशीम :** मंगरुळपीर :- शुक्रवार दि १२ सप्टेंबर रोजी रोजी एका कार्यक्रमाद्वारे सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले मंगरूळपीर इंडेन गॅस एजन्सी चे संचालक,नगरसेवक भाजपा नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम लालचंद चितलांगे यांचा शेलुबाजार येथे श्री साईबाबा संस्थांनच्या वतीने संस्थांनचे अध्यक्ष श्री मोहन राऊत यांच्यासह साई संस्थान विश्वस्त मंडळांनी शाल श्रीफळ व साईची प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. प्रसंगी श्री गुरुदेव सेवा मंडळाचे जिल्हा प्रचारक विनोदराव जाधव,शेलुबाजार मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष कैलास जाजू,सुदर्शन पाटील धोटे,सतीश पाटील,डॉ संजय राऊत,गंगादीप राऊत,महादेव विश्वकर्मा,नंदकिशोर भुजाडे,नंदू पावसे,चंद्रकांत गहूले,मुकुंदराव जायभाये,गोपाल जायभाये,सुरेश राऊत,उदेभान जाधव,उमेश राऊत,महेश गुप्ता,विशाल घोडे,विशाल गुप्ता,विशाल खंडारे,बाळू व्यवहारे,रवी बारड उपस्थित होते.




# नांद्रा धांडे येथे राष्ट्रीय लोककलावंत संघर्ष समितीच्या शाखेचे उत्साहात उदघाटन





बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत

**दे. माळी :** लोककलावंत, दिव्यांग आणि निराधार व्यक्तींच्या न्याय हक्कांसाठी लढणाऱ्या 'राष्ट्रीय लोककलावंत, दिव्यांग, निराधार संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य' या संस्थेची शाखा १७ सप्टेंबर रोजी नांद्रा धांडे (ता. मेहकर, जि. बुलढाणा) येथे मोठ्या थाटामाटात सुरू झाली. गावातील सर्व क्षेत्रांतील कलावंत आणि दिव्यांगांनी पुढाकार घेऊन हा शाखा फलक लावून शाखेची स्थापना केली. या सोहळ्याचे उद्घाटन सन्माननीय अरुण रायमुलकर, पोलीस पाटील माया अवसरमोल आणि तंटामुक्ती अध्यक्ष आशिष धांडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप बोरकर, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष दुर्गादास महाराज काटे, सचिव सतीश बोरकर यांच्यासह अनेक राज्यस्तरीय पदाधिकारी उपस्थित होते. तसेच, बुलढाणा जिल्हाध्यक्ष सुनील गाडेकर पाटील आणि मेहकर तालुका अध्यक्ष सुरेश जाधव यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातून निघाली भव्य रॅली शाखेच्या उद्घाटनानंतर गावातून फटाक्यांची आतषबाजी करत आणि वाजत गाजत भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीच्या समापनानंतर सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत मान्यवरांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, संघर्ष समितीच्या माध्यमातून कलावंतांच्या न्याय हक्कासाठी आणि त्यांच्या प्रश्नांसाठी अहोरात्र प्रयत्न केले जातील. कलावंतांचे प्रश्न सोडवल्याशिवाय समिती स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही मान्यवरांनी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हरिभक्त परायण प्रकाश महाराज मगर यांनी भूषवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नांद्रा धांडे शाखा अध्यक्ष विकास धांडे यांनी केले, तर आभार भागवत धांडे यांनी मानले. 'गाव तेथे संघर्ष समितीची शाखा झालीच पाहिजे,' असे आवाहन मान्यवरांनी यावेळी केले. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शाखा अध्यक्ष विकास धांडे, उपाध्यक्ष वामन अवसरमोल, सचिव भागवत धांडे यांच्यासह सर्व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाला गावातील महिला भजनी मंडळे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.